दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २८१ वा ▶ रविवार दि. ६ ऑगस्ट २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

### माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यावर गुन्हा दाखल



**मुंबई ।** मुंबईतील कथित कोविड घोटाळ्याप्रकरणी शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पेडणेकर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व त्यांच्या कुटुंबीयांच्या निकटवर्तीय मानल्या जातात. त्यामुळे ही कारवाई त्यांच्यासाठी मोठा झटका मानला जात आहे. यासंबंधीच्या वृत्तानुसार, मुंबईतील आग्रीपाडा पोलिस ठाण्यात किशोरी पेडणेकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## न्यूज कॉलम

### बेकायदेशीर नळधारकांना मनपाचा इशारा

**साक्री ।** शहरातील बेकायदेशीर नळ कनेक्शन धारकांना महापालिकेने कारवाईचा इशारा दिला आहे. ज्यांनी विनापरवानगी नळ कनेक्शन घेतलेले असतील अशा नागरिकांनी दहा दिवसांच्या आत महापालिकेच्या ठरावाप्रमाणे तीन वर्षांची पाणीपट्टीचा भरणा करावा, अन्यथा महापालिका अधिनियमानुसार अनधिकृत नळ कनेक्शन धारकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असा इशारा महापालिका प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

### महिलेला मारहाण, गुन्हा दाखल

**धुळे ।** शहरातील भंगार बाजार परिसरात मागील भांडणाच्या कारणावरुन सुफियान खान अब्दुल रशिद खान (वय ३१) यांना अस्ताफ जमेश मोहमद, माजिद साजिद मोहंमद, शहेजाद अकबर मजिद यांनी मारहाण केली. या वेळी वजू उत्ता खान याने महिलेची सोडवणूक केली. त्याचा राग आल्यामुळे खान यांच्या टेम्पो वाहनाचा काच फोडून नुकसान करण्यात आले. या प्रकरणी आझाद नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आदित्य ठाकरे यांच्या डोळ्यांवर पट्टी, त्यांना उत्तर देऊन काही फायदा नाही

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रत्युत्तर

**नाशिक । प्रतिनिधी**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारकडून बिलंब झाल्याने कोकणातील तेलशुद्धीकरण प्रकल्पात गुंतवणूक करणारी सौदी अरेबियाची 'अरामको' ही कंपनी पाकिस्तानात गेली आहे. या प्रकल्पाच्या विरोधात आंदोलन करणारे हे बंदी घातलेल्या 'ग्रीनपीस' संघटनेशी संबंधित असून, त्यांना या संघटनेचा पैसा येतो, असा आरोप केला होता.

त्यावर ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी ट्वीट करत नाणार असो की बारसू असो... भाजपा महाराष्ट्रद्वेषी आहे, हे वारंवार दिसतंच. त्याबरोबरच दिसतं ते मिंधेंचं सत्तेच्या लोभापायी कोकणी माणसाला दगा देणं! पण त्याहीपुढे प्रश्न पडतो, ह्यांचा कोकणावर आणि कोकणी माणसावर एवढा राग कश्यासाठी? पाकिस्तानशी संबंध, बंदिस्त संघटना, परदेशी फंडिंग अश्या गोष्टी कोकणाशी जोडून हे महाराष्ट्र द्वेष्टे कोकणी माणसाला देशद्रोही का ठरवू पाहताएत? असे म्हटले होते. तसेच उद्या हे कोकणी माणसाला नक्षलवादी म्हणतील, त्यांच्यावर देशद्रोहाचे गुन्हे दाखल करतील... स्वतःचं खोटं रेटायला कोकणी माणसाचा बळी देतील! कारण एकच-ह्यांच्या महाराष्ट्र द्वेषा विरुद्ध उभ्या राहणाऱ्या कोकणी माणसावरचा राग!, असे म्हणत फडणवीसांवर निशाणा साधला होता. दरम्यान, यानंतर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदित्य ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले की, किमान आदित्य ठाकरे अभ्यास करून किंवा भाषण ऐकून बोलतील, असे मला वाटत होते. पण, आदित्य ठाकरेंनी डोळ्याला पट्टी बांधली आहे. त्यामुळे ज्यांनी डोळ्याला पट्टी बांधलीय आणि विरोधाला विरोध करायचा आहे, अशांना उत्तर देऊन फायदा तरी काय? अशी टीका फडणवीसांनी आदित्य ठाकरेंवर केली आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी नाणार असो की बारसू भाजप महाराष्ट्रद्वेषी असल्याचे वारंवार दिसून येत आहे, अशी तिखट टीका केली होती. त्यांच्या या टीकेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी प्रत्युत्तर दिले. फडणवीस महाराष्ट्र पोलिस अकादमीच्या दीक्षांत सोहळ्याच्या निमित्ताने नाशिक दौऱ्यावर होते.

महाराष्ट्र पोलीस दल देशातील अतिशय प्रशिक्षित अतिशय शिस्तबद्ध असं पोलीस दल आहे. देशामध्ये आपल्या पोलिस दलाचा एक मोठा नावलौकिक आहे जी काही नवीन युगाची आव्हान काय आहेत, आर्थिक गुन्हेगारी याबाबतची प्रशिक्षण पोलिसांना देत आहोत. नवीन युगाची आव्हाने पेरण्याकरता आपलं पोलीस दल सज्ज असणार आहे देशातला सगळ्यात मोठा सायबर प्लॅटफॉर्म महाराष्ट्रात तयार करत असून आपण एकाच प्लॅटफॉर्मवर सोशल मीडिया बँकिंग सेक्टर नॉन बँकिंग संघटना असतील सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहार करणाऱ्या आर्थिक संस्था असतील, अशा सगळ्यांना एका प्लॅटफॉर्मवर आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे या माध्यमातून सायबर गुन्हेगारी आणि आर्थिक गुन्हेगारी मोडीत काढता येणार असल्याचं विश्वास गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.



### राहुल गांधींवर निशाणा

**यावेळी त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावरही निशाणा साधला. सुप्रीम कोर्टाने राहुल गांधी यांनी केलेले विधान अयोग्य ठरवले आहे. उच्चपदस्थ लोकांनी असे का म्हणू नये, हे ही स्पष्ट केले आहे. अशा प्रकारचा निकाल आल्यानंतर एका गोष्टीचे समाधान वाटते की, कालपर्यंत सर्वोच्च न्यायालयाला शिव्या घालणारे काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षाचे नेते सर्वोच्च न्यायालयाचे गुणगान करत आहेत. यातून आपल्याला न्याय मिळाला की, सुप्रीम कोर्ट चांगले आणि विरोधात निकाल गेला की, सुप्रीम कोर्ट वाईट असे विरोधकांचे सुरू असल्याचे दिसून येते, असे फडणवीस म्हणाले.**

### ठाकरे गटावर हल्ला

**ठाकरे गटाच्या मुखपत्राद्वारे भाजपावर तिखट टीका केली आहे. याविषयी फडणवीस यांना छेडले असता त्यांनी आपण हे मुखपत्र वाचत नसल्याचे स्पष्ट केले. महाराष्ट्र पोलिस दल देशातील अतिशय प्रशिक्षित व शिस्तबद्ध पोलिस दल आहे. देशामध्ये आपल्या पोलिस दलाचा एक मोठा नावलौकिक आहे, असेही ते यावेळी म्हणाले.**

### मी सामना वाचत नाही

**सामनामधून भाजपावर अत्यंत खालच्या पातळीवर टीका करण्यात आली आहे. या प्रश्नावर देवेंद्र फडणवीस म्हणाले 'मी सामना वाचत नाही'. तर विधानभेत औरंगजेबाचा मुद्दा चांगलाच गाजला. यावर प्रकाश आंबेडकरांनी देखील भाष्य केले. यावर फडणवीस म्हणाले की, विधानसभेत औरंगजेब या विषयावर चांगली चर्चा झाली असून यावर आता कुणाला उत्तर देण्याची आवश्यकता वाटत नसल्याचं फडणवीस म्हणाले.**

# गुन्हेगारांचे ब्लॅक स्पॉटचे सर्वेक्षण करून कॅमेरे बसवणार

**नाशिक । प्रतिनिधी**

शहरात अनेक ठिकाणी समाजकंटकांनी नागरिकांच्या वाहनांची तोडफोड करून दहशत प्रस्थापित करण्याचा प्रकार सुरु आहे. क्राईमलेस सिटी म्हणून नाशिकची ओळख निर्माण करण्यासाठी शहरांमधील प्रत्येक पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये टवाळखोर व गुन्हेगारांचे ब्लॅक स्पॉटचे सर्वेक्षण केले जाणार आहे. काल पालकमंत्री दादाजी भुसे यांनी या संदर्भात पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांच्याबरोबर चर्चा करत शहरातील कायदा सुव्यवस्था नियंत्रण राहण्यासाठी सूचना केल्या आहेत.

यावेळी चर्चेदरम्यान पोलीस आयुक्त शिंदे यांनी प्रत्येक पोलीस ठाणे निहाय असे ब्लॅक स्पॉट शोधून या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील. त्यासाठी महिनाभरात पोलीस ठाणे निहाय पोलीस निरीक्षकांकडून यादी मागवली जाणार आहे असे सांगितले. यावेळी ना. भुसे यांनी त्यानंतर पोलीस आयुक्तांसोबत चर्चा करून जिल्हा नियोजन समिती किंवा राज्य शासनाच्या महाआयटीकडून त्यासाठी विशेष निधी मंजूर करून घेतला जाईल. या ठिकाणी विशेष नमूद करण्याचे कारण की, शाळा, महाविद्यालयाच्या शैक्षणिक संस्था, लहान-मोठे क्लासेस व येण्या-जाण्याचा परिसर या ठिकाणी टवाळखोर गुन्हेगारांचा उपद्रव वाढल्याच्या तक्रारी येत असल्याने प्राधान्याने या भागामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील.

त्यासाठी ज्या शैक्षणिक संस्थांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे त्यांना देखील आवाहन केले जाईल. आपला पाल्य घरातून बाहेर पडल्यानंतर सुरक्षितपणे घरी परततील याची हमी देणारी व्यवस्था निर्माण केली जाणार आहे. यामुळे शहरातील प्रत्येक पालक चिंतामुक्त होणार आहे.

### आज संदेश भवन येथे शोक सभा



**धुळे ।** जिल्ह्यातील दलित पुरोगामी चळवळीशी विशेष नाळ जुळलेले महाराष्ट्रातील ख्यातनाम आंबेडकरी कवी, गायक, संगीतकार कालकथीत प्रा. सुरेश घायवट यांचे दि.४ रोजी रात्री २ वा. छत्रपती संभाजीनगर येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण आदरांजली वाहण्याकरिता धुळे शहर व जिल्ह्यातील तमाम राजकीय, सामाजिक, कला, संगीत, शैक्षणिक, सांस्कृतिक व दलित, पुरोगामी चळवळीच्या क्षेत्रातील मान्यवर यांच्या उपस्थितीत आज सकाळी १०. वाजता संदेश भूमी येथे शोकसभा आयोजित करण्यात आली आहे.

## दोन कोटीच्या रस्ता काँक्रिटीकरणाचा आ. फारुख शाह यांच्या हस्ते शुभारंभ

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयी सुविधांच्या विकास योजनेअंतर्गत प्रभाग क्रमांक दोन मध्ये कल्याणी बंगला ते केंद्रीय विद्यालय, डॉ.महेंद्र वाढे यांचे घर ते केंद्रीय विद्यालयापर्यंत रस्ता कामाचे उद्घाटन आमदार फारुक शहा यांच्या हस्ते करण्यात आले. धुळे शहरातील सुमारे पंचवीस ते तीस वर्षापासून असलेल्या कॉलनी आणि झोपडपट्ट्यांमध्ये रस्ते नसल्यामुळे, गटारी नसल्यामुळे धुळे शहरातील नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित राहत होते. शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्यास महानगरपालिकेतील सत्ताधारी पक्ष हे कुचकामी ठरलेले आहेत.

धुळे शहरातील मोठ्या प्रमाणात होत असलेल्या विकास कामांना बघून शहरातील नागरिकांनी आमदार फारुख शाह यांच्याकडे निवेदनाद्वारे आपल्या भागातील रस्ते, गटारी, पाण्याची सुविधा व अशा मूलभूत सुविधांसाठी फार अपेक्षेने मागणी केली होती. त्याला आमदार फारुख शाह यांनी धुळे शहरातील अनेक भागात रस्ते व गटारीसाठी व मूलभूत सुविधांसाठी करोडो रुपयांच्या निधी शासनाकडून प्राप्त करून घेतला आहे. शनिवारी सुमारे दोन कोटी रुपयांच्या रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ आमदार फारुक शहा यांच्या हस्ते केला गेला. या उद्घाटनाच्या कार्यक्रमात परिसरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की सुमारे ३० ते ४० वर्षापासून अनेक आमदार आले. परंतु फारुख शाह यांना आम्ही मागणी केली. त्यांनी ताबडतोब मागणी मान्य करत या रस्त्यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधी उपलब्ध करून दिला. त्याबद्दल या भागातील नागरिकांनी आमदार फारुक शहा यांचे आभार मानले. या कार्यक्रमाला नगरसेवक गनी डॉलर, डॉ. दीपश्री नाईक, डॉ.बापुराव नाईक, निजाम सय्यद, नजर पठाण, आसिफ शाह, प्यारेलाल पिंजारी, आर. व्ही.पाटील, डॉ.महेंद्र वाढे, ॲड.चंद्रा, रवींद्र भदाने, भटू पवार, शिवाजी मोरे, रतीलाल शिंदे, विकास सूर्यवंशी, प्रदीप पवार, डी. टी.पाटील, राकेश खांडेकर, कैलास चव्हाण, राजेश चव्हाण, शिरसाठ सर, शर्मा काकाजी, विजय शिंदे, नरेश पाटील, योगेश शिरसाठ, देविसिंग जाधव, शहजाद मन्सूरी आदी उपस्थित होते.

## केवळ दहा मिनिटांत चोरट्याने लंपास केली मोटरसायकल



**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील पारोळा रोड गल्ली क्रमांक पाच सहाच्या बोळीतून केवळ दहा मिनिटाच्या आतच चोरट्यांनी मोटरसायकल लंपास केली. चोरटा सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

येथील तहसीलदार कचेरीतील स्टॅम्प वेंडर गणेश सुरेश रणमळे (रा. गल्ली क्रमांक सात पारोळा रोड धुळे) गुरुवारी (ता.३) सकाळी दहाच्या सुमारास गल्ली क्रमांक पाच सहामधील मनोज बुकस्टॉल जवळील व्यापारी संकुलात गेले. आपली लाल- काळ्या रंगाची प्लेटिना मोटरसायकल (एमएच१८/ क्यु४६२९) लावून तेथीलच एका दुकानात गणेश रणमळे गेले. पाच ते दहा मिनिटानंतर ते पुन्हा आले असता त्यांची मोटारसायकल लंपास झाल्याचे आढळले. शोधाशोध घेऊनही मोटारसायकल मिळू शकली नाही. याप्रकरणी गणेश रणमळे यांनी आझाद नगर पोलिसांना माहिती दिली. घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज मिळवले असून त्यात चोरटा कैद झाला. चोरट्याने कशाप्रकारे मोटरसायकल नेली. हेही स्पष्ट दिसत आहे. दरम्यान वरील क्रमांकाची मोटरसायकल आढळल्यास संबंधितांनी जवळच्या पोलीस ठाणे किंवा आझाद नगर पोलिस ठाण्यात (०२५६२-२३०६५०, ९४२१५३१९३४) संपर्क साधावा, असे आवाहनही केले.

## ॲड.रावसाहेब मधुकर भिसे 'सोल्जर ऑफ कॉन्स्टिट्यूशन' पुरस्काराने सन्मानित

**धुळे । प्रतिनिधी**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वकिलीच्या शताब्दी वर्षानिमित्ताने ऑल इंडिया फेडरेशन ऑफ एडवोकेट्स अँड असोसिएशन्स न्यू दिल्ली यांच्यातर्फे धुळ्यातील सुप्रसिद्ध विधिज्ञ तथा धुळे जिल्हा बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ऍड. रावसाहेब मधुकर भिसे यांना 'सोल्जर ऑफ कॉन्स्टिट्यूशन' हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. फेडरेशनचे अध्यक्ष रवी जाधव व वरिष्ठ अध्यक्ष प्रकाश जगताप यांच्यासह प्रमुख मान्यवरांच्या हस्ते ॲड. मधुकर भिसे यांना सन्मानित करण्यात आले. कल्याण येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात हा पुरस्कार समारंभ दि. २८ जुलै रोजी थाटात पार पडला. ॲड.भिसे यांच्याबरोबरच जेष्ठ विधिज्ञ ॲड.विलास झाल्टे, ॲड. जितेंद्र निळे तसेच ड. उमाकांत घोडराज याना देखील मान्यवरांच्या हस्ते सोल्जर ऑफ कॉन्स्टीट्युशन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

ॲड. रावसाहेब मधुकर भिसे यांची विधी क्षेत्रातील संवेदनशीलता व सामाजिक बांधिलकी याची दखल घेऊन त्यांची द सोल्जर ऑफ कॉन्स्टीट्युशन पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. ॲड.भिसे अदिवासी विदयार्थी संघटना येथे कायदेशीर सल्लागार म्हणुन कार्यरत आहेत. आदिवासी विदयार्थी संघटनांच्या विविध आंदोलनांमध्ये सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना न्याय मिळवून दिला आहे. आदिवासी वस्तीगृहांची संख्या वाढवुन ५०० विदयार्थ्यांना वस्तीगृह उपलब्ध करून दिले. दलीत पँथर च्या चळवळीमध्ये सहभाग घेऊन विविध आंदोलनामध्ये आंदोलकांना न्याय मिळवून दिला. धुळे जिल्हा वकील संघ येथे सचिव म्हणुन सलग २ वेळा तर धुळे जिल्हा वकील संघ येथे उपाध्यक्ष म्हणुन सलग ३ वेळा निवड ऍड. भिसेंचि निवड झाली आहे. धुळे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथे शासकीय सभासद म्हणुनही ते काम पाहत आहेत. ऍड. रावसाहेब मधुकर भिसे, जेष्ठ विधिज्ञ ड. विलास झाल्टे, ड. जितेंद्र निळे तसेच ड. उमाकांत घोडराज यांच्या निवडीबद्दल नालंदा बुद्ध विहार निर्माण ग्रुप, नरडाणा, लुंबिनी बुद्ध विहार निर्माण ग्रुप, धुळे. संघशक्ती एक राष्ट्रशक्ती समूह, धुळे. लुंबिनी वन परिसर, धुळे. शांताई बहुउद्देशीय संस्था, धुळे. धुळे जिल्हा बुद्ध विहार समन्वय समिती, संथागार प्रतिष्ठान, धुळे. युबीजी विमर्श ग्रुप, धुळे. चक्रवर्ती सम्राट अशोक संघ, धुळे. सम्यक विचार मंच, धुळे. बुद्धिस्ट धम्मस्नेह समूह, धुळे. जीवन गौरव पुरस्कार समिती, धुळे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# फ्रेंडशिप डे : दु:ख अडवायला उंबऱ्यासारखा मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा

मैत्री म्हणजे जीवाला जीव देणं, मैत्री म्हणजे धम्माल. म्हणूनच 'हर एक फ्रेंड जरुरी होता है' यार! आजच्या यंगिस्तानमधली दोस्ती की ये दास्तान. तरुणाईचा लाडका फ्रेंडशिप डे आज साजरा होणार आहे. त्यामुळे फ्रेंडशिप बँड्स, छोटी-मोठी गिफ्ट आर्टिकल्स, ग्रीटिंग कार्डस यांनी दुकानं सजलेली दिसत आहेत.

कॉलेजमधून बाहेर पडलं की जवळपास प्रत्येकजण या दुकानांकडे धाव घेताना दिसतोय. कॅम्पसमध्ये, कट्ट्यावर, कॅन्टीनमध्ये चहाचे घुटके घेताना 'फ्रेंडशिप डे' चे प्लॅन्स तयार होतायत. फ्रेंडशिप डे निमित्त विविध प्रकारचे पन्नास रूपयांपासून ते हजार रूपयांपर्यंतचे गिफ्ट बाजारात आलेत. ब्रेसलेट पर्स, बांगड्या, रंगीबेरंगी आकाराचे बँड, चॉकलेट बुके, टेडीबेअर, मैत्रीचे संदेश देणारी विविध आकारातील रंगीबेरंगी शुभेच्छापत्रे व त्याचबरोबरीने इंग्रजीतील फ्रेंड्स' या शब्दाच्या आकाराचे चॉकलेट उपलब्ध आहेत.

काळ जरी बदलला असला तरीही मैत्रीच्या आणि फ्रेंडशिप डे साजरा करायच्या कल्पना, त्यामागच्या भावना मात्र बदललेल्या नाहीत. आजही हौशीने फ्रेंडशिप बँड आणले जातात. उत्साहाने मित्र-मैत्रीणींना शोधून- शोधून त्यांच्या हातावर तो बांधला जातो. स्केचपेनने हातावर नावं लिहायची मजा तर काही औरच. मात्र इ-मैत्रीचं फॅड कितीही वाटत असलं तरी ती ऑफलाइन मैत्रीची जागा घेऊ शकत नाही असा कौल आजच्या तरुणाईने दिलाय.ख-या मैत्रीचं नातं हे निःस्वार्थी असतं. एखाद्याशी मैत्री करताना ती स्वतः चा कोणताही फायदा बघून केली जात नाही. त्यामुळे मनात एखादा हेतू ठेऊन केलेली मैत्री टिकत नाही, असा विचार कित्येकांनी व्यक्त केला.

### ग्रुपच्या नावाचा केक

**फ्रेंडशिप डेसाठी आत खास केक कापण्याची प्रथा रुळली जाऊ लागली आहे. फ्रेण्ड ग्रुपच्या नावानुसार केकची ऑर्डर दिली जात आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेक वर्षांनी एकत्र आलेले मित्र, मैत्रिणींनी ग्रुप बनवले आहेत. ''दिल, दोस्ती, दुनियादारी'' ''भटके मित्र परिवार'', ''फ्रेंड्स कट्टा'' अशी अफलातून नावे ग्रुपला दिली आहेत. त्या नावाच्या केकची ऑर्डर दिली जात आहे.**



### सामाजिक जाणीवही

**कोणताही डे असो, खाऊ - पिऊ - मजा करू अशा पद्धतीने ते साजरा करताना तरुणाई पुढे असते. मात्र दुसरीकडे सामाजिक भानही जपले जात असल्याची उदाहरणे समोर येतात. मैत्रदिनाला सामाजिक बांधिलकची किनारही असते. कोणी वृक्षाला निसर्गाला फ्रेंडशिप बँड बांधून आपल्या जाणिवा व्यक्त करतात. कोणी पर्यावरण रक्षणासाठी मैत्री दिन साजरा करतात.**



शोध बातमी

**पुरुषोत्तम पाटील**
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०११११२६

# भांडणात मध्यस्थी केल्याने मुलाकडून बापाची निर्घृण हत्या

**धुळे । प्रतिनिधी**

मुलगा आणि सुनेमध्ये सुरु असलेल्या घरगुती भांडणात मध्यस्थी करणं बापाला चांगलंच महागात पडलं आहे. वादावेळी सूनबाईला राग आल्याने ती घरातून निघून गेली. याच गोष्टीचा राग आलेल्या संतप्त झालेल्या मुलाने बापाच्या डोक्यात लोखंडी पहार टाकून त्याचा खून केला. धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात ही धक्कादायक घटना घडल्याचे उघडकीस आले आहे.

साक्री पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंजारझाडी जवळील साबरसोंडा गावात रात्रीच्या वेळेस प्रकाश शामराव व त्याची पत्नीमध्ये घरगुती कारणावरून भांडण सुरू होते. प्रकाशचे वडील शामराव भिवसन जगताप हे त्याला समजवण्याचा प्रयत्न करत होते. याचवेळी प्रकाशची पत्नी घरातून निघून गेली.याच गोष्टीचा राग आल्याने प्रकाशने घरातील जुनी लोखंडी पहार उचलली व ती थेट वडिलांच्या कानावर मारली. लोखंडी पहारीचा वार वर्मी बसल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. यात शामराव जगताप यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच धुळे ग्रामीण उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे, साक्री पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक मोतीराम निकम यांनी पथकासह घटनास्थळावर धाव घेत माहिती जाणून घेतली. दरम्यान घटनेचे गांभीर्य पहाता जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी आरोपीस तात्काळ बेड्या ठोकण्याचे आदेश दिले.

## सरकार 'निर्दोष'

वेदांत-फॉक्सकॉन, किंवा टाटा एअर बस यांसारख्या कंपन्यांशी राज्य सरकार वा औद्योगिक विकास महामंडळाचे सामंजस्य करारच झाले नसल्याने हे उद्योग राज्याबाहेर गेले असे म्हणणे योग्य नसल्याचा युक्तिवाद या श्वेतपत्रिकेतून करण्यात आला आहे.

वर्षभरापूर्वी महाराष्ट्रात सत्तेवर आलेल्या शिंदे-फडणवीस सरकार आणि त्याआधीचे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास सरकार यांच्यात राज्यात येऊ घातलेले उद्योग परराज्यात गेल्यावरून कलगीतुरा रंगला होता. वेदांत-फॉक्सकॉन, एअर बस, सॅफ्रन आणि बल्क ड्रग पार्क हे प्रकल्प राज्याबाहेर गेल्यावरून परस्परांना जबाबदार धरण्याची अहमहमिकाच जणू लागली होती! आता या चारही प्रकल्पांबाबतची श्वेतपत्रिका परवा विधिमंडळात मांडण्यात आली. विद्यमान महायुतीच्या सरकारने स्वतःलाच त्यातून निर्दोष ठरवले आहे. राज्याच्या औद्योगिक विभागाने ही श्वेतपत्रिका तयार केली आहे. अनेक महत्त्वाचे प्रकल्प राज्याबाहेर जात असल्याच्या मुद्द्यावर विरोधकांनी सरकारला लक्ष्य केले होते. विरोधकांचे आरोप फेटाळून लावत उद्योग मंत्री उदय सामंत यांनी यावर श्वेतपत्रिका काढण्यात येईल, असे गेल्या नोव्हेंबरमध्ये जाहीर केले होते. तब्बल ९ महिन्यांनी ही श्वेतपत्रिका समोर आली आहे. एखाद्या प्रकरणात सरकारची भूमिका व कृती कोणती आणि एखाद्या विषयाबाबत जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर करणे हा श्वेतपत्रिका काढण्यामागील हेतु असतो. श्वेतपत्रिकेतील माहिती ही अधिकृत समजली जाते. विरोधकांनी हे उद्योग राज्याबाहेर गेल्याचे खापर शिंदे-फडणवीस सरकारवर फोडले होते. मात्र, हा आरोप श्वेतपत्रिकेद्वारे अमान्य करण्यात आला. राज्य सरकारच्या चुकीमुळे एकही प्रकल्प राज्याबाहेर गेला नाही, उलट आधीच्या सरकारनेच वेळीच निर्णय घेतले असते तर ही परिस्थिती उद्भवली नसती. औद्योगिक प्रकल्प महाराष्ट्रात उभारण्यासाठी औद्योगिक विकास महामंडळे अथवा राज्यशासनाशी कोणताही सामंजस्य करार झालेला नव्हता. त्यामुळे प्रकल्प राज्याबाहेर गेला असे म्हणणे योग्य नाही, असे समर्थन या श्वेतपत्रिकेद्वारे करण्यात आले आहे. एअर बस प्रकल्पाबाबतही औद्योगिक विकास महामंडळाशी सामंजस्य करार झालेला नव्हता, तसेच सरकारच्या उद्योग विकासाचा केंद्रीय मंत्रालय अथवा टाटा कंपनीशी पत्रव्यवहारही झालेला नाही, असेही याद्वारे स्पष्ट करण्यात आले. फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला गेला यावरून विरोधकांनी शिंदे-फडणवीस सरकारला धारेवर धरले होते. मात्र, वेदांतबरोबरच्या भागीदारीतून फॉक्सकॉनने माघार घेतल्याने आता हा प्रकल्प गुजरातमध्येही होणार नाही.

परदेशी गुंतवणूक

फॉक्सकॉन-वेदांत प्रकल्प आधी पुण्याजवळ तळेगाव येथे होणार होता. सेमीकंडक्टर चिपच्या निर्मितीसाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरला असता. मात्र, ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर तो गुजरातकडे वळवण्यात आल्याने विरोधकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांच्यावर टीका करण्याची व त्यासाठी शिंदे-फडणवीस सरकारला जबाबदार धरण्याची आयतीच संधी मिळाली होती. २०२२-२३ या आर्थिक वर्षात म्हणजे शिंदे-फडणवीस सरकारच्या कार्यकाळात महाराष्ट्र औद्योगिक विकासात पुन्हा प्रथम क्रमांकावर आल्याचा दावा अलीकडेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. या काळात १ लाख १८ हजार कोटींची गुंतवणूक झाली असल्याचे त्यांनी म्हटले आहे. देशातील एकूण गुंतवणुकीत महाराष्ट्राचा वाटा २९ टक्के इतका आहे. २०२०-२१ मध्ये औद्योगिक गुंतवणुकीत गुजरात तर २०२१-२२ मध्ये कर्नाटक आघाडीवर असले, तरी आता महाराष्ट्राने हे अव्वल स्थान पटकावले असल्याचा राज्य सरकारचा दावा आहे. फडणवीस यांनी दिलेली ही आकडेवारी आणि काल परवा सादर झालेली श्वेतपत्रिका यातून महायुतीच्या सरकारने राजकीय हिशेब चुकता केला आहे. तसेच औद्योगिक प्रकल्प राज्याबाहेर जाण्यास आधीचे सरकारच जबाबदार असल्याचे चित्र निर्माण करण्यात सरकार यशस्वी ठरले आहे. श्वेतपत्रिकेद्वारे सरकारने आपल्यावर झालेल्या आरोपावर पांघरूण घातले आहे. महाराष्ट्र हे गुंतवणुकीसाठी उद्योग जगतातील प्राधान्य असलेले राज्य होते आणि आहे; पण राज्यात उद्योजकांना खंडणीखोरी, कंत्राटे मागणारे आणि महाग वीज व लालफितीचा कारभार यांमुळे त्रास दिला जात आहे. त्यामुळे परदेशी गुंतवणूक वाढली असे वाटत असले, तरी प्रत्यक्षात असे उद्योग अस्तित्वात येऊन त्याद्वारे रोजगार खरोखरीच वाढतो का, हेही तपासून बघायला हवे.

# स्मरणात संचित तळोद्यातील ते प्रेरणादायी दिवस...

१९८४ साली आई वडिलांची तळोदयाला बदली झाल्यामुळे आम्ही सगळे तळोदयात आलो. मी शेठ के डी हायस्कूलला आठवीला प्रवेश घेतला. तसेच मोठ्या बहिणीने कॉलेजला व आम्ही चार भावंडांनी हायस्कूलला प्रवेश घेतला. तेव्हा पंकज चौधरी, पंकज बागुल, संजय पुराणिक, राजेंद्र चौधरी, दीपक क्षत्रीय हे माझे आठवी अ मधील वर्गमित्र होते. श्री साळी सर मुख्याध्यापक तर श्री ए व्ही वाणी सर, पटेल सर ,बोरदे सर, मार्तंड जोशी सर, कलाल सर, बि एम चौधरी सर, पवार सर हे आमचे आठवी ते दहावी पर्यंत शिक्षक होते. शाळेत फार शिस्त होती व शैक्षणिक वातावरण फार उत्तम होते. आठवड्यातून एकदा बि के पाटील सर एनसीसी परेड घ्यायचे. आमचे चित्रकलेचे शिक्षक श्री पी. व्ही.पाटील सर फार मनापासून शिकवायचे. खरतर मला चित्रकलेची आवड नव्हती, पण त्यांनी माझी चित्रकलेतील आवड प्रयत्नपूर्वक वाढवली. संध्याकाळी शाळेत चित्रकलेचा क्लास व्हायचा, त्यातून अनेक मुलांना चित्रकलेची आवड निर्माण झाली.

संस्कृत पुराणिक सर शिकवत. तेव्हा गावात शेठ के डी हायस्कूल व न्यू हायस्कूल या दोनच शाळा होत्या. गावाबाहेर महाविद्यालय होते. खाजगी प्राथमिक शाळा नव्हत्या व जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा होत्या. संपूर्ण गावात तुरळक मोटरसायकल होत्या, महाविद्यालयीन मुलं सायकल वापरीत पण बहुतेक लोक पायीच गावभर फिरत. आमच्या शाळेत दरवर्षी शारदोत्सव व्हायचा, त्या काळात उत्तम वक्त्यांचे आठवडाभर भाषण आयोजित केले जायचे. आमचे मराठीचे शिक्षक मार्तंड जोशी हे संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेली वक्ते होते. श्री कलाल सरांमुळे मी बॅडमिंटन चा दररोज सराव करू लागलो.

संजय पुराणिक, विजय चव्हाण, प्रवीण पाटील, भास्कर माळी व आम्ही इतर मित्र दररोज के डी हायस्कूलमधील शाखेत जायचो. संध्याकाळ आम्ही सर्व मित्र हातोडा रोड ला फिरायला जायचो. क्रिकेट सिव्हिल हॉस्पिटल मागील ग्राउंड, के डी हायस्कूल चे ग्राउंड तसेच ऋषिकेश बारगळ च्या गढी मधील मैदानावर खेळायचो. गावातील सर्व गल्ल्या मुलांकरता क्रिकेट ग्राउंडच होत्या.

तळोदयापासून दोन-तीन किलोमीटरवर तापी नदी आहे. नंदुरबार ला जायचे तर तापी नदीतून नावेने जावे लागे. तेव्हा प्रकाशाचा तसेच हातोड्याचा पूल पूर्ण न झाल्यामुळे नंदुरबारशी फारशे दळणवळण नव्हते.

तळोदयात मराठी, अहिराणी, गुजराती, आदिवासी भाषा प्रामुख्याने बोलल्या जायच्या. या संपुर्ण भाषांच्या मिश्रणातून तळोदया ची अशी स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण बोली भाषा तयार झाली होती. तळोदया पासून जवळच गुजरात राज्य सुरू व्हायचे. तळोदयातील बहुतेक गल्ल्या ची नावे जातीनिहाय होती. प्रत्येक समाजाचे लग्न कार्यालय होते. तळोदया जवळच सातपुड्याच्या पर्वतरांगेला सुरुवात होते. आजूबाजूची जमीन खूप सुपीक होती. तळोदा तालुक्यात वरती सातपुडा व खाली तापी यामुळे मुबलक पाणी होते. त्यामुळे तळोदया च्या आसपास २ -३ खांडसऱ्या होत्या. तळोदा गावच्या तिन्ही बाजूला गुजरात राज्याची सीमा ओलांडून गावात प्रवेश करावा लागतो व चौथ्या बाजूला सातपुडा पर्वत अशा निसर्गरम्य वातावरणात तळोदा गाव आहे. संपूर्ण तालुका आदिवासीबहुल आहे. दिवसभर शहरात आदिवासी बांधवांची बाजाराला गर्दी असायची. तसेच गावात मोळ्या व कोळसा विकणाऱ्या आदिवासी बाया फिरत असत.

शाळेजवळ शुक्रवारी जनावरांचा बाजार भरायचा. आम्ही राहायचो तिथून जवळच विसालाल पंचवाडी हे लग्न कार्यालय होते. तेथे सारखे लग्न, मौंज किंवा इतर कौटुंबिक कार्यक्रम होत. तेव्हा जंगलाची एवढी हानी झालेली नव्हती. आमच्या पहिल्या मजल्यावरील घराच्या खिडकीतून संध्याकाळी उन्हाळ्यात जंगलातील वनवा पेटलेला दिसायचा. पावसाळ्यात आम्ही सर्व मित्र मिळून जंगलात पावसाळी सहल काढायचो. दिवाळीच्या आसपास सातपुड्याच्या पर्वतावर अस्तंबा ची यात्रा भरायची. अस्तंबा शिखरावर पायी जायला बारा तास लागायचे, यायला पुन्हा तेवढाच वेळ, पण ती यात्रा चिरस्मरणात राहील अशी आनंददायी असायची. संध्याकाळी फिरायला गावाबाहेरच्या महादेव मंदिरात देखील आम्ही जात असू. श्रावणी सोमवार ला या कणकेश्वर महादेव मंदिरावर खूप गर्दी होत असे.

तळोदयाला सर्वच सण फार जोरात साजरे केले जायचे. कांदे नवमीला आम्ही सर्व शेजारी शेतात जाऊन कांदे नवमी साजरी करायचो. तेव्हा तळोदया ला टीव्ही नव्हता पण जवळच्या आमलाड गावात टीव्ही होते. आम्ही सायकलीवर जाऊन आमलाडला क्रिकेटची मॅच बघायचो. मी दररोज नगरपालिकेच्या वाचनालयात पेपर वाचायला जायचो.

तळोदा नगरपालिका १८६७ झाली स्थापन झालेली, महाराष्ट्रातील सर्वात जुन्या नगरपालिका पैकी एक आहे. तेव्हा वाचनालया जवळच मेन रोडवर कविता व जगदीश ही प्रसिद्ध उपहारगृह होते. तळोदयाला शुक्रवारी नविन चित्रपट लागायचा. तेव्हा गावात कल्पना व सुभाष ही दोन चित्रपटगृहे होती. तळोदयाला सर्व प्रकारचा भाजीपाला व फळे फार मोठया प्रमाणात मिळत. तेव्हा तळोदा चे केळी व सिताफळ फार प्रसिद्ध होते. आम्ही राहायचो तेथील सर्व कुटुंब एकमेकात फार समरस झाले होते. उन्हाळ्यात सुट्ट्यांमध्ये आम्ही गप्पां मारीत बसायचो. तेव्हा नगर सेठ ,बजाज, जोशी व आम्ही सर्व भावंड पत्ते व वेगवेगळे खेळ खेळायचो. अरविंद भाई व रवींद्र वाणी, राजेंद्र जोशी ,सुहास जोशी या सर्व कुटुंबांशी अजूनही आमचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत.

अंगणात कोणी कितीही ओरडले तरी आमचे क्रिकेट सुरू असायचे. राजू बजाज, सुहास जोशी, बोनी , बंटी वाणी हे आमचे टीम मेंबर होते. अंगणात असलेली भिंत आमचे स्टंप होते. तेव्हा तळोदयाला दहावीनंतर मुले पुण्याला जास्त शिकायला जायची. डॉ टेकवानी, डॉ वाणी, डॉक्टर मगरे, डॉ काकडे, डॉ आचलेकर, डॉ मराठे हे तळोदयातील प्रसिद्ध डॉक्टर होते. टेकवाणी डॉक्टरांचा गोटू माझा वर्गमित्र होता. तेव्हा माळी, तेली, साळी, वाणी, बारी, ब्राह्मण ,बागवान, मुस्लिम व आदिवासी समाजाची इतरही समाजाबरोबर मुख्य वस्ती होती. माळी समाज व तेली समाज यांचे प्रमाण सर्वात जास्त होते. माळी समाजातील लग्न आपसातच होत . गावात होळी, गणेश उत्सव, शिवजयंती मोठ्या प्रमाणात साजरी केली जायची. रथपौर्णिमेला रथ यात्रा निघायची. होळी सण फार मोठ्या प्रमाणावर साजरा केला जायचा, आदिवासी बांधवांचा होळी हा सर्वात मोठा सण असतो. खानदेश गल्लीत साखरेचे होळीसाठी कंकण व अनेक दागिने तयार करून मिळत. बडा दादा व छोटा दादा गणपती हे दहा दिवस बसत तर बाकीचे गणपती सात दिवस बसत. मेन रोडवर श्रीकृष्ण मंदिर ,बालाजी मंदिर, गणपती मंदिर ,मारुती मंदिर, दत्त मंदिर, महादेव मंदिर अशी खूप मंदिर होते . पूर्ण गावाला कालिका देवी यात्रेचे खूप आकर्षण असे. यात्रेत टुरिंग टॉकीज येत असे ,त्याच्यात इंटर्वल नंतर फ्री पास असे .स्टॅन्ड तसे थोडेसे गावाबाहेर होते. स्टँड पासून तर हातोडा रोडपर्यंत येणारा मेन रोड हीच मुख्य बाजारपेठ होती. तळोदयातील एकूणच वातावरण सांस्कृतिक व आनंददायी होते. गावात खूप संपन्नता होती.

आदिवासी भाग असला तरी शिक्षणात बऱ्याच लोकांनी प्रगती केली होती. गावातले पहिले मॅट्रिक झालेले श्री गोपालजी यांच्या घराला गोपाल मॅट्रिक् चे घर तर पहिल्या बी कॉम कन्हैयालालजींच्या घराला कन्हैया बी कॉम चे घर म्हणायचे! तळोदयात मला अनेक जवळ जीवाभावाचे मित्र मिळाले अजूनही त्या सर्वांची माझी उत्तम संबंध आहेत.

दोन तीन वर्षा आड मी तळोदया ला जात असतो. १९८७ झाली मी दहावी पास झालो व शिकायला गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक जळगावला गेलो व त्यानंतर एक वर्षांनी आई वडिलांची बदली दोंडाईचा ला झाल्याने आम्ही दोंडाईचा ला शिफ्ट झालो. परंतु ८४ ते ८७ हा माझ्या तळोदयातील शिक्षणाचा कालखंड माझ्या जडण-घडणीत ला मुख्य कालखंड आहे. तळोदयात मला उत्तम शिक्षक मिळाले, उत्तम शेजारी मिळाले, उत्तम मित्र मिळाले .तापी नदी बघायला मिळाली, उत्तम शेती, शेजारील पर्वतरांगा ,संपूर्ण आजूबाजूचा हिरवळ असलेला परिसर, आदिवासी लोक वस्ती, त्यांची जगण्याची पद्धत हे सर्व अनुभवता आले.



शब्द संवाद

प्राचार्य प्रशांत पाटील
(नाशिक) मो.९५११८५९९३९

# हरित ऊर्जा उज्ज्वल भवितव्य असलेले गुंतवणूक क्षेत्र

मानवी विकासाच्या दृष्टीने ऊर्जा म्हणजेच काम करण्याची शक्ती महत्त्वाची आहे. भौतिक शास्त्राच्या नियमाप्रमाणे ऊर्जा निर्माण किंवा नष्ट करता येत नाही. फक्त एका ऊर्जेचे रूपांतर दुसऱ्या ऊर्जेत करता येते. जी ऊर्जा रूपांतरित करताना पर्यावरण समस्या सहसा उद्भवत नाहीत, त्यांचे साठे शाश्वत असतात अशा ऊर्जेस हरित ऊर्जा किंवा शाश्वत ऊर्जा असे म्हणतात. जलसाठा, वेगाने वाहणारे वारे, सूर्य, समुद्राच्या लाटा, जैविक इंधन इ. हरित ऊर्जेचे स्रोत मानता येतील.

पेट्रोल, डिझेल यांचे अपुरे साठे आणि ते डॉलर्स देऊन आयात करावे लागत असल्याने त्याचा अर्थव्यवस्थेवर पडणारा ताण कमी करण्यासाठी चालू अर्थसंकल्पात हरित ऊर्जेस प्रोत्साहन देण्यासाठी भरीव तरतूद केली आहे. सन २०७० पर्यंत भारत हा शून्य कार्बन उत्सर्जन करणारा देश असेल हे आपले ध्येय आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पात सरकारने आपले जे सात प्राधान्यक्रम ठरवले आहेत, त्यात हरित ऊर्जेचा प्राधान्य क्रमांक पाचवा आहे. असे उच्च ध्येय मनाशी ठेवून आपण त्या दिशेने वाटचाल करण्यास सुरुवात केली आहे. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून आपण सन २०२२ मध्ये सौर ऊर्जेचे आणि ती साठवून ठेऊ शकणाऱ्या वस्तूंची निर्मिती करण्यास प्रोत्साहन दिले. सन २०३० पर्यंत ५०० जीडब्ल्यू एवढी सौर ऊर्जा आपल्या वापरात असेल (१ जीडब्ल्यू म्हणजे १००० दशलक्ष वॅट). असा संकल्प आपण गेल्या वर्षी केला, तेव्हा १७३ जीडब्ल्यू एवढी सौर ऊर्जा वापरात होती त्याच्या आपण याचा



वापर तिप्पट करणार आहोत. सध्या ८० जीडब्ल्यू सौर ऊर्जा निर्मितीच्या प्रकल्पाची उभारणी चालू आहे. या वर्षापासून दरवर्षी ३० ते ३५ जीडब्ल्यूचे प्रकल्प अस्तित्वात आले, तर आपले उद्दिष्ट दोन वर्षे आधीच म्हणजे सन २०२८ रोजी पूर्ण होऊ शकते.

या क्षेत्रातील गुंतवणुकीत सध्या मोठ्या प्रमाणत परकीय गुंतवणूक येत असून ही गुंतवणूक वीज निर्माण करणे आणि साठवून ठेवणे यासाठी लागणाऱ्या साधनसामग्रीच्या निर्मितीच्या गुंतवणुकीत आहे. त्यामुळेच इतर क्षेत्रांच्या तुलनेत येथे भरीव वाढ होत आहे. देशांतर्गत आणि परदेशात जेथे ग्रीन हायड्रोजन प्रकल्प होऊ घातले आहेत त्यातील अडथळे बाजूला करण्याचे काम चालू आहे. सौर ऊर्जेखालोखाल पवन ऊर्जानिर्मिती क्षेत्रांस येणाऱ्या अडचणी सोडवण्याचे प्रयत्न चालू आहेत.

हरित ऊर्जा निर्मिती क्षेत्रात सर्वात मोठा अडथळा म्हणजे प्रकल्प निर्मितीसाठी येणारा प्रचंड खर्च. त्या मानाने त्यातून निर्माण झालेली ऊर्जा स्पर्धात्मक दराने विकावी लागते. त्यामुळे त्यातून मिळणारे उत्पन्न एक गुंतवणूकदार म्हणून गुंतवणूक करणाऱ्याच्या दृष्टीने कमी आकर्षक आहे. अगदी साधे उदाहरण द्यायचे झाल्यास १ एमडब्ल्यू सौर ऊर्जा निर्माण करण्यासाठी प्रकल्प स्थानानुसार ४ ते ५ कोटी रुपये गुंतवणूक करावी लागते, तर पवन ऊर्जेसाठी हाच खर्च ७.५ ते ८.२ कोटी रुपये आहे. यातून निर्माण झालेली वीज बाजारात स्पर्धात्मक दराने विकावी लागते. वीज कशापासून निर्माण झाली हा प्रश्न विकताना येत नाही. त्या दृष्टीने जलविद्युत निर्मितीतील गुंतवणूक खर्च खूप कमी आहे. त्याचप्रमाणे ऊर्जानिर्मिती ते वितरण केंद्र आणि ग्राहक यांच्याकडे नेण्यासाठी होणारा खर्च आणि वहनातून होणारी घट हा मोठा प्रश्न आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात सुयोग्य जागा लागत असल्याने आणि आता सर्वच ठिकाणी जागृती वाढल्याने जमीन अधिग्रहण करण्यात मोठे अडथळे निर्माण होऊन प्रकल्प खर्चात वाढ होते. आधीच हे प्रकल्प खूप खर्चिक असल्याने त्यातून फायदा मिळण्यास अधिक कालावधी लागतो. यादृष्टीने सर्वच प्रकारातील हरित ऊर्जा अधिक किफायतशीर कशी करता येईल या दृष्टीने संशोधन चालू असून त्याचे परिणाम सकारात्मक आहेत. त्याचप्रमाणे ही ऊर्जा पर्यावरण स्नेही असल्याने त्यास अधिकाधिक प्रोत्साहन देणे हे सरकारी धोरण आहे. यासाठी यातील गुंतवणूक ही पायाभूत क्षेत्रातील गुंतवणूक समजली जाते.

**क्रमशः**

**- उदय पिंगळे: मुंबई ग्राहक पंचायत**

## शब्दकोडे-१४१



**आडवे शब्द -**

८. महिना १०. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सागराला केलेली विनंती- '---- प्राण तळमळला' १६. चोप १७. पत्नी १९. फालतू बकबक २०. निरंतर २२. मौज २३. तांब्या २४. प्रथा २५. रानरेडा २७. साठ मिनिटे ३०. रहस्यमय ३१. पांढरा ३३. स्त्री ३५. खोटारडा ३८. समजायला सेपे ४०. गंध ४१. स्वच्छता ४४. देव ४६. नाकातील अलंकार ४८. एक लवचिक पदार्थ ४९. दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा ५१. डाग ५३. अबोल्याची खूण ५५. दया ५७. बभ्रा, गाजावाजा ६०. दुखापत ६१. चरबी ६३. उन्हाची तलखी ६४. पर्वत ६५. मालदार ६६. निष्णात ६८. अभिनेता ७०. प्रपात ७१. अशुद्ध रक्तवाहिनी ७३. अतिशय कंजूष ७७. धांदल ७८. खग ८१. विश्वास ८२. रम लेला ८३. किरकोळ, नगण्य

**उभे शब्द -**

१. सोन्याच्या रंगाचे २. हनुमान ३. चित्रपट ४. ताकद ५. सरहद्द, वेस ६. देव ७. पाणी पिण्याचे भांडे ८. तपास ९. रियाझ ११. परातंत्र्य १२. फरक १३. गवत १४. मिलाप, भेट १५. सासरी होणारा छळ १७. अफवा १८. अमसुलाचे फळ २०. पावा २१. तमाशा २६. डिंक २८. संपूर्ण २९. दुधी भोपळ्याचा गोड पदार्थ ३२. बदल, हलवाहलवी ३४. मासेमारीचे साधन ३६. गाठोडे ३७. प्रवास ३८. पायऱ्या असलेली विहीर ३९. नौका ४२. बहाणा ४३. दुबळा ४४. सोपे ४५. खाट ४७. शीण ५०. स्त्रीलिंगी लांब हात असलेला, श्रीरामाचे विशेषण ५२. शाहिरी काव्य ५४. गुडघ्यापर्यंत लांब हात असलेला, श्रीरामाचे विशेषण ५६. उपवासाचे तांदूळ ५८. आभाळाला भिडलेले, खूप उंच इमारत इ. ५९. भूत ६२. वंचित, मुकलेला ६३. रात्र ६५अ. पूजासामग्रीचे ताट ६७. ज्ञात ६९. स्नानाचे पात्र ७२. तांबडा ७३. थडगे ७४. दुष्ट बेत ७५. ढोंग ७६. बहुमानाचे संबोधन ७९. दूध ८०. सवलत

## शब्दकोडे १४० चे उत्तर

आडवे उत्तर

३.भस्म ४.सुतराम ७.द्वारका १०.संत ज्ञानेश्वर १२.रंग १४.मका १५.ताक १६.तहहयात १९.केरसुणी २१.सरूप २३.विशद २६.जरा २८.जीवन २९.जलचर ३१.कुल ३२.नमक ३५.कायम ३६.जवळीक ३७.करवत ३९.हुज्जत ४०.नात ४१.फार ४३.हयगय ४७.अवगत ५०.करमणूक ५२.कवायत ५३.गाजरपारखी ५५.वाकी ५६.गदा ५७.सुरा ५८.मौन ६०.अस्वीकृत ६२.गौरी ६३.साम ६५.गीतांजली ६७.मास ६८.ऋण ६९.उपहार ७०.बरा ७१.मारा ७२.जीत ७३.गर्व ७४.कडा ७६.मिंधा ७७.चीन ७९.रिपु ८०.मार ८१.नश्वर ८२.विपरीत ८३.अघळपघळ

उभे उत्तर

१.कृतक २.साने गुरुजी ३.भरत ५.तरंत ६.राग ८.रमणी ९.काका १०.संतापजनक ११.दहशत १३.द्वार १७.हवि १८.याद २०.सुधा २२.पवना २४.मलम २५.अलक २७.रामरक्षा २९.जयजयकार ३०.रजत ३१.कुळीथ ३३.कव ३४.लज्जत ३८.तफावत ४०.नायक ४२.रग ४४.धमकी ४५.सुकर ४६.निकड ४७.अयशस्वी ४८.तगादा ४९.सुरसुरी ५१.रवानगी ५४.पारा ५६.गत ५९.लाजरा ६०.असमाधान ६१.कृमी ६२.गौण ६३.साप ६४.महाग ६६.तांबडा ६८.ऋत ६९.उर्वरित ७२.जीन ७४.कवळ ७५.गरळ ७७.चीर ७८.तूप ८०.माघ

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# 'अमृत भारत स्थानक योजना' अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील रेल्वेस्थानके चमकणार : डॉ.पवार

## देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे होणार उद्घाटन

**लासलगाव । वार्ताहर**

केंद्र सरकारमार्फत रेल्वे मंत्रालयाच्या वतीने अमृत भारत (-र्ींिीं इहरीीं) स्टेशन योजनेतून भुसावळ विभागातील १५ रेल्वेस्थानकांचा विकास होऊन प्रवाशांना सर्वोत्तम व अत्याधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. या योजनेतून नाशिक जिल्ह्यातील मनमाड रेल्वेस्थानक आधुनिकीकरण रु.४४.८० कोटी, नगरसुल रेल्वेस्थानक आधुनिकीकरण रु. २०.०३ कोटी, लासलगाव रेल्वेस्थानक आधुनिकीकरण रु.१०.१० कोटी, नांदगाव रेल्वेस्थानक आधुनिकीकरण रु. १०.१४ कोटी, निधी मंजूर करण्यात आला असून या रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास होऊन रेल्वे स्थानकांचा कायापालट होणार असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण



राज्यमंत्री डॉ. भारती प्रवीण पवार यांनी दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मनमाड, चाळीसगाव, शेगाव, बडनेरा, मलकापूर, नेपानगर या सहा रेल्वे स्थानकावर रविवारी (दि. ६) सकाळी ९ वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून होणार असल्याचेही डॉ. पवार यांनी सांगितले. दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील मनमाड येथे केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार उपस्थित राहणार आहेत व नांदगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुहास कांदे देखील उपस्थित राहणार आहेत. रेल्वे मंत्रालयाने अमृत भारत स्टेशन योजनेतून देशातील ५०८ रेल्वेस्थानकांचा विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. या कार्यक्रमास केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील, रेल्वे राज्यमंत्री दर्शना ज़रदोष यांची उपस्थिती असणार आहे.

या योजनेअंतर्गत विविध अद्यावत सोयी सुविधा प्रवाशांना उपलब्ध होणार आहेत. यामुळे नागरीकांकडुन सर्व स्तरावर आनंद व समाधान व्यक्त केले जात आहे. स्थानक प्रबंधक ऑफिस, पार्सल ऑफिस, हेल्थ ऑफिस, टीसी ऑफिस, एमसीओ ऑफिस यांचे पूर्णपणे नूतनीकरण केले जाणार आहे. नवीन कोच डिस्प्ले बोर्ड बसवण्यात येणार आहे.विकास कामांमध्ये स्थानकाच्या दर्शनी भागाचा विकास, लँडस्केपिंग, मॉडल टॉयलेट, प्लॅटफॉर्म सरफेस केबल ट्रेज, अत्याधुनिक फर्निचर भरपूर प्रकाश योजनेसाठी एलईडी, नाम फलक, पार्किंग व्यवस्था, प्रतीक्षागृह स्वच्छतागृह, नवीन फूटओवर बीज, दोन्ही प्लॅटफॉर्मवर लिफ्ट व्यवस्था, नवीन कोच डिस्प्ले, सीसीटीव्ही कॅमेरे आदींचा समावेश असणार आहे. जिल्ह्यातील चाकरमान्यांचा प्रवास अधिक सुखकर व आरामदायी होण्यासाठी रेल्वेस्थानकांचा पुनर्विकास करण्यासाठी भरीव निधीची तरतूद केल्याने डॉ. पवार यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी व रेल्वे मंत्रालायचे आभार व्यक्त केले आहे.

# लासलगाव ग्रामीण रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्याचा प्रश्न मार्गी

**मंत्री छगन भुजबळ यांच्या सूचनेनुसार जिल्हा नियोजनच्या माध्यमातून होणार रस्त्याचे काम पूर्ण**

**नाशिक । वार्ताहर**

राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या सूचनेनुसार लासलगाव बाजार समितीकडून विंचूर बाह्य वळण रस्त्यावर असलेल्या ग्रामीण रुग्णालयाकडे जाणाऱ्या एक किलोमिटर अंतराच्या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला आहे.मंत्री छगन भुजबळ यांच्या सूचनेनुसार जिल्हा नियोजनच्या माध्यमातून या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या सूचनेनुसार प्रदेश पदाधिकारी



दिलीप खैरे यांनी लासलगाव ग्रामीण रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्याची पाहणी केली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता घोडे, शाखा अभियंता गणेश चौधरी, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे शाखा अभियंता गायकवाड, छगन भुजबळ यांचे विशेष कार्यकारी अधिकारी उदयसिंग राजपूत, स्विय सहायक बाळासाहेब लोखंडे, अशोक गालफाडे, पांडुरंग राऊत, विलास गोरे, अनिल विंचूरकर,ओम राऊत यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

लासलगाव ग्रामीण रुग्णालाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी या मागणीचे पत्र माजी आमदार कल्याणराव पाटील यांनी ना छगन भुजबळ यांना पाठवले होते जिल्हा नियोजन निधीच्या माध्यमातून लासलगाव ग्रामीण रुग्णालयाकडे जाणाऱ्या या एक किलोमीटर अंतराच्या रस्त्याचे काम करण्यात येणार आहे.

# डॉ.शेफाली भुजबळ यांच्या चित्रांचे जहांगीर आर्ट गॅलरीत होणार प्रदर्शन

**नाशिक । प्रतिनिधी**

एमइटी भुजबळ नॉलेज सिटीच्या मार्गदर्शिका डॉ.शेफाली भुजबळ यांची बसट्रॅक्ट पेंटिंग या शैलीतील प्रसिद्ध पेंटिंग्स नेहमीच विविध प्रदर्शनात प्रसिद्ध झाली असून त्यांना कलाप्रेमींचा खूप सुंदर प्रतिसादही मिळाला आहे.

कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशनतर्फे कॅन्सर पेशंटला मदत करण्याच्या उद्देशाने आर्टवल फाउंडेशन तर्फे 'ऱ्हापसोडी २०२३' या नावाने म्हणजेच उत्साह व अत्यानंदाने अविष्कार या अर्थाने मुंबई येथील प्रसिद्ध जहांगीर आर्ट गॅलरी येथे चित्र प्रदर्शनी दि. ८ ते १४ ऑगस्ट दरम्यान होत आहे. या ठिकाणी डॉ.शेफाली भुजबळ यांच्या काही निवडक पेंटिंग्सचा प्रदर्शनात सहभाग आहे.

सामाजिक उपक्रमाच्या व कॅन्सर



पेशंटला मदत करण्याचा उद्देशाने आयोजित या प्रदर्शनीमध्ये विविध नामवंत चित्रकारांबरोबरच डॉ. शेफाली भुजबळ यांचे पेंटिंग्स प्रदर्शनात समाविष्ट होत आहेत. कला व चित्र प्रेमींनी या प्रदर्शनाचा निश्चितच लाभ घ्यावा असे आवाहन कॅन्सर पेशंटस एड असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे. याचबरोबर या प्रदर्शनामध्ये इतरही कलाकृतींचा म्हणजे विशेषतः मूर्ती कलेचाही सहभाग आहे.

# अतिशय प्रतिष्ठित मानलेल्या वंजारी समाजरत्न पुरस्काराचे ९ ऑगस्टला वितरण

**विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या २१ जणांसह स्पर्धा परीक्षेतील गुणवंतांचा गौरव**

**यांचा होणार गौरव ...**

**शैक्षणीक, सहकार, सामाजिक, राजकिय क्षेत्रात मोठे योगदान देणाऱ्या पंढरी नाथ थोरे यांचा नागरी सत्कार करण्यात येईल. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. त्यात ज्येष्ठ उद्योजक बुधाजी पानसरे, गिरिश पालवे, माधुरी कांगणे, ज्येष्ठ पत्रकार श्याम उगले, धनंजय बोडके न्यायधिश कीर्ती कातकडे, प्रादेशिक जलसंधारण अधिकारी हरिभाऊ गीते, कृषी अधिकारी रणजित आंधळे आदींसह २१ जणांचा समावेश आहे.**

**नाशिक । प्रतिनिधी**

क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक क्रांती सेना व न्यू विकलांग बहु उद्देशिय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांती दिनी ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता वंजारी समाजरत्न पुरस्कार २०२३ चे आयोजन करण्यात आले आहे. कॅनडा कॉर्नर येथील व्ही एन नाईक शिक्षण संस्थेच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात स्पर्धा परीक्षे तील गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत साहित्याचे गाढे अभ्यासक व श्री सिध्दी विनायक मानव कल्याण मिशनचे अध्यक्ष डॉ तुळशीराम महाराज गुट्टे राहणार आहेत.प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सुहास कांदे, आ.नरेंद्र दराडे , माजी आ. बाळासाहेब सानप, नाईक संस्थेचे अध्यक्ष पंढरीनाथ थोरे, ज्येष्ठ उद्योजक बुधाजी पानसरे, भाजपचे ज्येष्ठ नेते गिरिश पालवे, पोलिस अधीक्षक माधुरी कांगणे, पालकमंत्री भुसे यांचे ओएसडी रामदास खेडकर, जिल्हा परिषदे माजी अध्यक्ष शितल सांगळे, वंजारी सेवा संघाचे गुजरात प्रदेश अध्यक्ष मोहन घुगे, वंजारी सेवा संघाचे अध्यक्ष बबन खाडे, गुजरात येथील भोज राज गीते, सामाजिक कार्यकर्त्या कांचनताई खाडे, यमुनाताई घुगे , अरुणा दरगुडे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमास समाजबांधवांनी उपस्थित रहावे , असे आवाहन आयोजक दतु बोडके, समिती अध्यक्ष बी. के.नागरे सर, रंगनाथ दरगुडे, बाळासाहेब घुगे, प्रकाश चकोर, मारुती इलग , आदिनाथ नागर गोजे, विलास सानप, रोही दास आव्हाड आदींनी केले आहे.

# अधांतर : भूमी व अवकाश ग्रंथाचे ८ ऑगस्ट रोजी प्रकाशन

**नाशिक । प्रतिनिधी**

ख्यातनाम लेखक नाटककार जयंत पवार यांनी लिहिलेल्या नाटकाचा संहिता व प्रयोग या अंगाने वेध घेणाऱ्या राजू देसले यांनी संपादित केलेल्या ✻अधांतर : भूमी व अवकाश या मराठी ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक मा. श्री. भालचंद्र नेमाडे यांच्या हस्ते होणार आहे. हा प्रकाशन सोहळा मंगळवार, दि. ८ ऑगस्ट २०२३, रोजी सा. ५.३० वा. रवींद्र नाट्यमंदिर, पु. ल. देशपांडे कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथे होईल. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ज्येष्ठ रंगकर्मी श्री. एम. के. रैना (श्रीनगर), श्री. विश्वास ठाकूर (कुटुंब प्रमुख, विश्वास ग्रुप) यांच्या उपस्थितीत हा सोहळा होईल.

'अधांतर' नाटकाच्या रौप्य महोत्सवानिमित्त हा कार्यक्रम होणार असून लोकवाङ्मय गृह, जयंत पवार आप्त आणि मित्र परिवार आणि विश्वास ग्रुप, नाशिक यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

कवी व लेखक श्री. रवींद्र लाखे, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक प्रा. श्री. प्रवीण बांदेकर, अभिनेते, कवी मा. श्री. किशोर कदम, पत्रकार आणि लेखक मा. श्री. समर खडस, लेखिका मा. श्रीमती संध्या नरे-पवार, लोकवाङ्मय गृहचे प्रकाशक मा. श्री. राजन बावडेकर, अधांतर (मराठी) चे दिग्दर्शक मा. श्री. मंगेश कदम आणि अधांतर (हिंदी) चे दिग्दर्शक मा. श्री. अनिरुद्ध खुटवड हे या कार्यक्रमाचे वक्ते आहेत. कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यात दुपारी २.३० ते ५.३० दरम्यान दिग्दर्शक अनिरूद्ध खुटवड यांनी दिग्दर्शित केलल्या अधांतर (हिंदी) नाटकातील काही प्रवेशांचे अभिवाचन भूमिका दुबे, यतेंद्र बहुगुणा, अपराजिता डे, अशोक कुमार, पद्मनाभ बिंड, संजीव जयस्वाल, जितू राभा हे करतील. त्यानंतर 'अधांतर' मूळ संचातील कलाकार संजय नार्वेकर, लीना भागवत, अनिल गवस, आशिष पवार, हेमंत भालेकर, सविता मालपेकर, राजन भिसे यांच्याशी संवादक मुकुंद कुळे खुला संवाद साधतील. विशेष म्हणजे अंधांतरशी संबंधित कलाकार, दिग्दर्शक व तंत्रज्ञ यांचा मा. भालचंद्र नेमाडे व मा. एम. के. रैना यांच्या हस्ते सत्कार होणार आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन दत्ता बाळसराफ हे करणार आहेत. तरी.या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# भटक्या कुत्र्यांनी केले शाळकरी मुलाला जखमी

**नाशिकरोड । प्रतिनिधी**

नाशिक-पुणे रोडवरील फेम सिनेमागृहामागे एका शाळकरी मुलाला कुत्र्यांनी हल्ला करत जखमी केले आहे. या घटनेमुळे परिसरामध्ये दहशतीचे वातावरण पसरले असून या कुत्र्यांचा बंदोबस्त नाशिक मनपाने करावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

अवनीश प्रवीण घेगडमल (८ वर्ष) हा बाफना प्राइड विजय ममता थेटरच्या पाठीमागे नाशिक-पुणे रोड येथे पार्किंगमध्ये उभा असताना सकाळी आठ वाजता भटक्या कुत्र्यांनी या शाळकरी मुलावर हल्ला केला. हा मुलगा सेंट झेवियर्स स्कूलमध्ये जायला निघाला होता. यासंदर्भात भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी लोकांनी केली आहे.

---

**ॲड.प्रमोद एम. चौधरी**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**अमळनेर येथिल मे. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) सो.यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज नं १२०/२०२३**

१) रजुवाई नकुल पाटील
२) रोनक नकुल पाटील
३) सौ. सरलाबाई जहागीरदार पाटील
वरील सर्व रा. प्लॉट नं.८, अथर्व बंग्लो, स्वामी समर्थ केंद्राजवळ, मुंदडा नगर, अमळनेर ता. अमळनेर जि. जळगांव .....**अर्जदार**

**विरूध्द**

**कोणीही नाही**

(कै. नकुल जहागिरदार पाटील -मयत) .....**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी अमळनेर येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि. १७/०६/२०२३ रोजी दि. कि. अर्ज नं. १२०/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. नकुल जहागिरदार पाटील - (मयत-दि.०६/११/२०२३) यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. ०८/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास अमळनेर येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क स्तर कोर्ट नं. २ यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण- अमळनेर
दिनांक :- ०४/०८/२०२३

(शिक्का)

**व.लिपिक** — **मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.**
**सहाय्यक अधिक्षक** — **मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.**

---

**प्रोसेस पेड**

**ॲड. एम. जी. महाजन**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क स्तर यांचे कोर्टात**

**दिवाणी क्रि. अर्ज. नं. ९६१/२०२३**

१. श्रीमती. साखरबाई तात्या टीळे (ठेलारी)
२. चि.जिभाऊ तात्या टीळे (ठेलारी)
३. चि.किसन तात्या टीळे (ठेलारी)
४. मालबाई तात्या टीळे (ठेलारी)
५. श्रीमती तापाबाई सुका टीळे (ठेलारी)
सर्व रा. मेहेरगांव, ता. जि. धुळे. .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** .....**सा.वाला**

कै. तात्या सुका टीळे (ठेलारी) ......**मयत**

कायदेशिर वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी
(Legal Heirship Certificate)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत तात्या सुका टीळे (ठेलारी) यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला मिळणेकामी मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क स्तर कोर्ट नं. ५ यांचे कोर्टात दिनांक १८/०९/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकीलांमार्फत/प्रतिनिधी मार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत तात्या सुका टीळे (ठेलारी) यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate ) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत एकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि. ०४/ ०८/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरुन

(शिक्का)

**कामगीरी कारकुन** — **दिवाणी न्यायालय क.स्तर, धुळे**
**अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय क.स्तर, धुळे**

---

**ॲड. सिध्दार्थ जे. हसवाणी**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ५वे सह दिवाणी न्यायाधिश सो. बरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**कि.दि.अर्ज नं. ९३५ / २०२३**

१) कुणाल अनिल माने
२) मेघना अनिल माने
३) विद्याबाई अनिल माने
तीघे रा. २१/बी टेलीफोन कॉलोनी, शनी मंदीराजवळ, गोंदूर रोड, ता. जि. धुळे .....**अर्जदार**

**आणि**

कै. सुमनबाई विक्रम माने
शेवटी राहणार :- रा. २१/बी टेलीफोन कॉलोनी, शनी मंदीराजवळ, गोंदूर रोड, ता. जि. धुळे ......**मयत**

ज्याअर्थी वरील अर्जदार मयत कै. सुमनबाई विक्रम माने यांचे वारस आहेत. मयत कै. सुमनबाई विक्रम माने यांचे दिनांक १०/०८/२०२२ रोजी निधन झाले. मयत कै. सुमनबाई विक्रम माने यांच्या वर नमुद कायदेशीर वारस यानात्याने शासकीय व निमशासकीय आणि इतर स्वराज्य संस्था येथे उपयोगासाठी अर्जदारांच्या नावाने हेअरशीप सर्टिफिकेट मिळावे म्हणून अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी वर नमुद केलेल्या नुसार मयतांचा वारसाबाबत हेअरशीप सर्टिफिकेट अर्जदार यांचे नावे देण्यास कोणाचीही हरकत अगर तकार असल्यास त्यांनी दि. १६/०९/२३ रोजी १० वाजता वर निर्दोष्ठ केलेल्या कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून मांडाव्यात अन्यथा अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे हेअरशीप सर्टिफिकेट देण्याबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल.

आदेशावरुन

(शिक्का)

**कामगीरी कारकुन** — **दिवाणी न्यायाधीश, व. स्तर धुळे.**
**अधिक्षक** — **दिवाणी न्यायाधीश, व. स्तर धुळे.**

---

**ॲड.संदीप अर्जुन गर्दे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज क्र. ९४७/२०२३**

१. सुचिता नितीन देवरे .....**अर्जदार**

**विरूध्द**

**निरंक** ......**जाबदेणार**

कै.नितीन विश्वासराव देवरे, ......**मयत**

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. सो. धुळे यांचेकडे दि. १ / २०२३ रोजी अर्जदार यांनी कि . दि . अर्ज क्र. १०/२०२३ चा अर्ज कै. नितीन विश्वासराव देवरे, यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयतांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयातून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.२०/०९/२०२३ हि निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधिताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कोर्ट नं. ९ सो, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारीखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी, त्याअर्थी मे.कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण : धुळे
दि. ०४/०८/२०२३

आदेशावरुन

(शिक्का)

**कामगीरी कारकुन** — **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धुळे**
**अधिक्षक** — **मा.दिवाणी दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धुळे**

---

**ॲड. निखिलकुमार रविंद्र वडनेरे, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ६ वे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर सो. यांचे न्यायालयात.**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ९५३/२०२३**

श्री. राजीव मोहनलाल अग्रवाल वै .....**अर्जदार**

विरूध्द

कै. पुनम राजीव अग्रवाल (मयत) ......**मयत**

ज्याअर्थी की, अर्जदार नं. १ श्री. राजीव मोहनलाल अग्रवाल हे कै. पुनम राजीव अग्रवाल यांचे पती आहे तर अर्जदार नं. २ स्नेहा राजीव अग्रवाल हया कै.पुनम राजीव अग्रवाल यांची मुलगी आहे तर अर्जदार नं. ३ हर्षल राजीव अग्रवाल हया कै. पुनम राजीव अग्रवाल यांची मुलगी आहे. कै. पुनम राजीव अग्रवाल हया कायमस्वरूपीचे धुळे येथील रहिवासी आहे व त्यांचे उपचार घेत असतांना दि. २७/६/२०२३ रोजी मौजे मुंबई पश्चिम येथे निधन झालेले आहे. अर्जदार यांना शासकिय कामांसाठी वारस दाखला मिळण्याकरीता अर्जदारने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफेकेट मिळण्याकरीता या मे. कोर्टात अर्ज केलेला आहे. आणि

ज्याअर्थी की, सदर अर्जाचे कामकाज दि. ०५/०९/२० रोजी मे. कोटीत चौकशी कामी नेमलेले आहे.

त्याअर्थी की, सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी वा वकीलांमार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही, हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर
धुळे
दिनांक - ०४/०८/२०२३

आदेशावरुन

(शिक्का)

**व.लिपिक** — **फौजदारी न्यायालय साक्री**
**अधिक्षक** — **दि.न्या.व.स्तर, धुळे**

## न्यूज कॉलम

### झेड. बी. पाटील महाविद्यालयास 'उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार

धुळे । कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे शहरातील जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट संचलित झेड. बी. पाटील महाविद्यालयास केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पासाठीचा उत्कृष्ट महाविद्यालय व महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी. के. पाटील यांना उत्कृष्ट समन्वयक पुरस्कार जाहीर झाला. ११ ऑगस्ट २०२३ ला विद्यापीठ नामविस्तार दिन समारंभात विजेत्यांना विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. आर. एस. माळी यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी असतील. दरम्यान, या पुरस्काराबद्दल जयहिंद शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष डॉ. अरुण साळुंके, उपाध्यक्ष प्रमोद पाटील, सचिव प्रदीप भदाणे, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष प्रा. सुधीर पाटील व संचालक मंडळाने अभिनंदन केले आहे.

### अल्पवयीन मुलीचे अपहरण

धुळे । शहरातील पवन नगरातील १७ वर्षीय अल्पवयीन तरुणी बेपत्ता झाली आहे. सर्वत्र शोध घेऊन देखील ती मिळून आली नाही. काही तरी आमिष दाखवून तिचे अपहरण करण्यात आले. अशी तक्रार मुलीच्या आईने चाळीसगाव रोड पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यावरुन अपहरणाचा गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी योगेश राजाराम सोनार याच्यावर संशय व्यक्त करण्यात आला आहे.

# नांदर्खी येथे एक हात मदतीचा उपक्रमांतर्गत दाखल्यांचे वाटप

## विभागीय आयुक्तांसह ,जिल्हाधिकारी जि. प. सीईओ यांची उपस्थिती

साक्री । प्रतिनिधी

तालुक्यातील नांदर्खी येथे महसूल सप्ताहाचे औचित्य साधून 'एक हात मदती'चा उपक्रमांतर्गत परिसरातील ग्रामस्थांना विविध दाखल्यांचे वाटप नाशिक विभागीय आयुक्त श्री.राधाकृष्ण गमे यांच्या हस्ते आज करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी श्री अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता ,साक्रीचे प्रांत श्री. रवींद्र शेळके,साक्री पंचायत समितीचे सभापती श्री शांताराम कुवर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्तांहातर्गत साक्री तालुक्यातील कुडाशी, उमरपाटा, नांदर्खी मंडळ मिळून शासकीय आश्रमशाळा उमरपाटा (नांदर्खी) येथे 'एक हात मदती'चा उपक्रमांतर्गत विविध दाखल्यांच्या वितरणाचा कार्यक्रम आज आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नाशिक विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे ,जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, प्रांत रवींद्र शेळके, सभापती शांताराम कुवर, तहसीलदार साहेबराव सोनवणे , गट विकास अधिकारी शशिकांत सोनवणे, अप्पर तहसीलदार रवींद्र शेळके यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थी, ग्रामस्थांना विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. यामध्ये वारस नोंदी ,सातबारा वाटप करण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देखील वितरित करण्यात आले. याप्रसंगी बोलताना विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे म्हणाले की ,शासनाच्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून योजना प्रभावीपणे पोहोचविण्यास मदत मिळते, आणि जनतेचा शासनावरील विश्वास देखील वृद्धिंगत होत असतो. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी ई हक्क प्रणाली, ई पीक पाहणी याबद्दल सविस्तर माहिती देऊन शासनाच्या विविध योजनांचा लाभ जनतेने घ्यावा असे आवाहन केले. तसेच अतिदुर्गम भागात योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महसूल विभागामार्फत प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता म्हणाले की शासन आणि जनतेत सुसंवाद असला तर विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावीरित्या होत असते. यासाठी सर्वांनी प्रामाणिक प्रयत्न करण्याची गरज आहे असे सांगून महसूल सप्ताह निमित्त होणाऱ्या कार्यक्रमांची रूपरेषा सांगितली .

या कार्यक्रमास अप्पर तहसीलदार श्री शेजुळ, नायब तहसीलदार श्री चंद्रकांत शिंपी, नायब तहसीलदार श्री बापू बहिरम,सहाय्यक गटविकास अधिकारी श्री बी. व्ही पाटील, मंडळ अधिकारी श्री प्रमोद राजपूत, विस्तार अधिकारी श्री हर्षल महंत, श्री अमृत महाले, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता श्री एच जी पवार , जिल्हा परिषद सदस्य श्री छगन राऊत, गाजऱ्या वळवी, सरपंच रमेश कुंवर, तलाठी नीलिमा शिंदे ग्रामसेवक जितू गवळी यांच्यासह सरपंच, पोलीस पाटील, ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार संजय सोनवणे यांनी तर आभार प्रदर्शन प्रांत श्री रविंद्र शेळके यांनी केले

**साक्री तहसील येथे वृक्षारोपण**

महसूल सप्ताह निमित्त साक्री येथील तहसील कार्यालयाच्या आवारात नाशिक विभागीय आयुक्त श्री राधाकृष्ण गमे, जिल्हाधिकारी श्री अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास विविध मान्यवर उपस्थित होते.



# नाशकातील उड्डाणपुलाखालील अतिक्रमण दूर करून रस्त्याचे, सुशोभीकरणाची कामे करावी- मंत्री भुजबळ

### द्वारका, मुंबई नाका सर्कलचा अभ्यास करून सर्कलची रुंदी कमी करावी

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या उड्डाणपुलाच्या खालच्या भागात अनधिकृत विक्रेते तसेच अनधिकृत पार्किंगमुळे उड्डाणपुलाखाली विद्रुपीकरण होत आहे. तसेच रस्ता खराब झाल्याने अनेक अपघात देखील होत आहे. त्यामुळे नाशिक महापालिका, नॅशनल हायवे विभाग आणि पोलीस विभागाने एकत्रितरित्या काम करून हे अतिक्रमण हटविण्यात यावे, रस्त्याची सुधारणा व सुशोभीकरणाची कामे तातडीने करण्यात यावी अशा सूचना राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी सबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

नाशिक येथील कार्यालयात त्यांनी अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली. त्याप्रसंगी त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या. यावेळी नॅशनल हायवे विभागाचे प्रकल्प संचालक भाऊसाहेब साळुंखे, पोलीस उपायुक्त चंद्रकांत खांडवी, मनपा अतिक्रमण विभागाचे उपायुक्त नितीन नेर, सहायक सुरेंद्र वाघ यांच्यासह सबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

त्याचबरोबर उड्डाणपुलाखाली असलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. मुंबई नाका तसेच द्वारका सर्कलला वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी. त्याचबरोबर उड्डाणपुलाखाली असलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. मुंबई नाका तसेच द्वारका सर्कलला वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

यावेळी ना. छगन भुजबळ म्हणाले की, नाशिक शहरातील उड्डाणपुलाखाली मुंबई नाका ते आडगाव नाका परिसरात अनधिकृत विक्रेते व वाहनांच्या पार्किंगमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. याठिकाणी विक्रेत्यांकडून कचरा तिथेच टाकला जात आहे. तसेच त्या ठिकाणी केलेल्या सुशोभीकरणाच्या कामाचे नुकसान होत असून परिसराचे विद्रुपीकरण होत आहे. त्यामुळे येथील अतिक्रमण तातडीने दूर करावे अशा सूचना त्यांनी केल्या. त्याचबरोबर उड्डाणपुलाखाली असलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. मुंबई नाका तसेच द्वारका सर्कलला वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी. तसेच अभ्यासगट नेमून या दोन्ही सर्कलची रुंदी कमी करण्यात यावी यासाठी नाशिक महापालिका, नॅशनल हायवे विभाग व पोलीस प्रशासनाने समन्वयातून काम करावे अशा सूचना त्यांनी सबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

# मीना भुजबळ स्कूल ऑफ एक्सलन्सच्या विद्यार्थ्यांची आर्टिलरी सेंटर म्युझियमला भेट




नाशिक । प्रतिनिधी

आपल्या देशाच्या मिलिटरीच्या उच्च अशा परंपरेला माहिती देणारे आर्टिलरी सेंटरमध्ये देवळाली कॅम्प येथे म्युझियम असून त्याच्या संदर्भात मीना भुजबळ स्कूल ऑफ एक्सलन्सच्या इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी कारगिल विजय दिवस निमित्त तेथे भेट दिली.

शाळेच्या प्राचार्य शुभ्रा वर्मा व शिक्षक वृंद आणि स्टाफ या ठिकाणी विद्यार्थ्यांबरोबर होता. डिफेन्स सिस्टम्स, वेगवेगळ्या लढाई बद्दलच्या फिल्म, नकाशा संदर्भातील माहिती, युद्धाबद्दलचे फोटो, वेगवेगळे व्हिडिओ तसेच याबद्दलची सचित्र माहिती व प्रत्यक्ष माहिती येथील सुभेदार जितेंद्र सिंग यांनी दिली. तेथे प्रदर्शित असलेले वेगवेगळे टॅक्स म्हणजेच रणगाडे हे देखील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहता आलेत.

लहान वयामध्ये विद्यार्थ्यांना उत्तम अशा प्रकारचे संस्कार व देशाविषयीचे भावना यानिमित्ताने निर्माण होत असते. यावेळी आर्टिलरी सेंटरच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानण्यात आले. विद्यार्थ्यांनी कारगिल विजय दिवस निमित्त तेथे भेट दिली.



# मणीपूरसह महिला अत्याचारांविरोधात विविध संघटनांचे प्रशासनाला निवेदन

धुळे । प्रतिनिधी

मणीपूर घटनेतील हिंसाचार व महिलांवरील अत्याचाराविरोधात संपूर्ण देशभर तीव्र संतापाची लाट उसळली आहे. त्याचबरोबर देशासह राज्यातील विविध भागांमध्ये महिला व मुलींवर अत्याचार होत असल्याच्या घटना घडत आहेत. यामुळे महिला सुरक्षिततेला मोठा धोका निर्माण झाला असून समाज अशा घटनांमुळे संतप्त होत आहे, या घटनांना पायबंद घालून मणीपूरसह महिला अत्याचाराच्या घटनांमधील नराधम आरोपींना तात्काळ शोधून अटक करा, त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करुन फासावर लटकवा अशा मागण्या प्रशासनाकडे निवेदनांद्वारे मोठ्या संख्येने केल्या जात आहेत. शुक्रवारी धुळे महानगर विकास मंचतर्फे याबाबत प्रशासनाला निवेदन देण्यात आले. निवेदनावर अंनिसचे कार्याध्यक्ष अविनाश पाटील, कॉम्रेड एल.आर. राव, कॉम्रेड पोपटराव चौधरी, माजी आमदार प्रा. शरद पाटील, प्रा, बी.ए. पाटील, रामदास जगताप, डी,टी. पाटील, दिलीप देवरे, नवल ठाकरे, डॉ. संजय पाटील, प्रा. जसपालसिंह सिसोदिया, दिलीप पवार, अनिल देवपूरकर इत्यादींच्या सह्या आहेत, मूलनिवासी संघ व मूलनिवासी विद्यार्थी संघ यांनीही प्रशासनाला निवेदने देवून मणीपूरसह महिला अत्याचारांविरोधात कठोर कारवाईची मागणी केली. निवेदनांवर नरेंद्र खैरनार, प्रा. मोहन मोरे, ईशान मोरे, प्रज्ञा मोरे, रोहन मोरे, चैतली मराठे यांच्या सह्या आहेत.

# महापुरुषांची जयंती साजरी न करणाऱ्या शाळांसह कार्यालयांवर कारवाई करा



### गुरु रविदासजी विचार मंचाची मागणी

धुळे । प्रतिनिधी

समाजातील विविध थोर महापुरुषांची जयंती सर्व शाळा, महाविद्यालये तसेच शासकीय कार्यालयांमध्ये साजरी करण्यात यावी असे राज्य शासनाचे आदेश आहेत. मात्र या आदेशाचे पालन न करता काही शाळांसह शासकीय कार्यालयांमध्ये मागासवर्गीय समाजातील थोर महापुरुषांची जयंती साजरी केली जात नाही. महापुरुषांच्या कार्याचा हा अपमान आहे. महापुरुषांबाबत जातीचे विभाजन करण्याची मानसिकता ठेवणार्या अशा शाळा व कार्यालयांवर कायदेशीर कारवाई करा, तसेच त्यांच्यावर अॅट्रासिटी कायद्यानुसार गुन्हे दाखल करा अशी मागणी मोची चर्मकार समाज गुरु रविदासजी विचारमंचने जिल्हा प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनावर कन्हैया साखरे, देवेंद्र जपसरे, भूषण शिंदे यांच्या सह्या आहेत.

# सैंदाणें सारखे अष्टपैलू शिक्षक सेवानिवृत्त होणे ही संस्थेसाठी मोठी पोकळी : मराठे

पिंपळनेर । प्रतिनिधी

इंदिरा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळनेर येथील ज्येष्ठ शिक्षक तथा पर्यवेक्षक पि डी सैंदाणे वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवापुर्ती गौरव समारंभ संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अध्यक्षस्थानी होते. सैंदाने हे आपल्या उत्तम हस्ताक्षर, वकृत्वामुळे पंचक्रोशीत सुपरिचित आहेत. आपल्या कुशल अध्यापनामुळे गणित विषयाची गोडी सरांनी विद्यार्थ्यांना लावली. उत्तम नियोजन , कामातील चोखपणा, टापटीपपणा, प्रामाणिकपणा, संघटन कौशल्य, सुसंवाद , मनमिळाऊपणा ही सरांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये. आपल्या ३४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून तात्यांनी संस्था, विद्यालय, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यामध्ये आपलेपणाची भावना निर्माण केली. सर्व क्षेत्रात परफेक्ट व अष्टपैलू शिक्षक तात्यासाहेब आहेत असे गौरव उद्गार




संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब यांनी सत्कार प्रसंगी पेढा भरवून काढले.

विद्यालयाच्या प्राचार्य पवार यांनी सैंदाने यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामातील हातखंडा व अचूकपणा या गुणांचे कौतुक केले. सैंदाने यांचा जीवनपट, त्यांच्या शैक्षणिक, प्रशासकीय कार्याची व गुणवैशिष्ट्यांची सविस्तर माहिती विद्यालयातील शिक्षक जे एन मराठे यांनी दिली.

सैंदाने यांचे सुरुवातीपासूनचे सहकारी तथा ज्येष्ठ शिक्षक श्री ए एच शिंदे यांनी सैंदाने यांच्या सहवासातील आठवणींना उजाळा दिला. याप्रसंगी संस्थेचे संचालक जयेश मराठे, संचालक कुणाल गांगुर्डे, संचालक बापूसाहेब यजुर्वेंद्र गांगुर्डे, विद्यालयाच्या प्राचार्य पवार, बी एड कॉलेजचे प्राचार्य डॉ. सतीश पाटील सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार निखिल बाविस्कर यांनी केले.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518,
सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# नाशिक शहरातून निघाली मशाल रॅली













नाशिक
। नाशिक महापालिकेच्या वतीने पर्यावरण विभाग व हिरवांकुर फाउंडेशनच्या माध्यमातून दादासाहेब गायकवाड सभागृह येथे दि. ४ ते ६ ऑगस्ट दरम्यान देशी प्रजातीच्या झाडांची रोपांची माहिती देणाऱ्या प्रदर्शनाचे अर्थात वृक्षोत्सव प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उदघाटन पर्यावरण प्रेमी भारती गमे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व फीत कापून करण्यात आले. विविध प्रकारच्या देशी प्रजातींचे वृक्ष या प्रदर्शनात मांडले असून आयुर्वेदात देशी प्रजाती झाडांचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती शालेय विद्यार्थी प्रदर्शनाला भेट देणाऱ्या नागरिकांना देत आहेत. याप्रसंगी हिरवांकुर फाउंडेशनच्या वतीने देशी-प्रजाती वृक्षांची, रोपांची माहिती असलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन नाशिक मनपाचे पर्यावरण विभाग प्रमुख तथा उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, पर्यावरण प्रेमी भारती गमे, उद्यान अधिक्षक विवेक भदाणे, घनकचरा व्यवस्थापन संचालक डॉ. कल्पना कुटे, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, हिरवांकुर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शाह निलयबाबु, शिक्षण अधिकारी बापूसाहेब पाटील, सायकलिस्ट फाउंडेशनचे योगेश वारे, प्रितेश महाजन, राखी शहा, प्रीती चौधरी, अनिल जगताप, पार्वती पटेल, योगेश पाटील, संतोष रेवडे पाटील, कैलास बोराडे, जगनाथ पावर, उल्हास कुलकर्णी, मनोज गायधनी, मनीषा रौंदल यांसह अनेक मान्यवरांनी केले. उदघाटन सोहळ्यादरम्यान शालेय विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. प्रास्ताविकात डॉ.विजयकुमार मुंडे यांनी सविस्तर माहिती विशद केली. प्रदर्शनाच्या उदघाटन सोहळ्यापूर्वी सकाळी ७ वाजता सायकल रॅली, मशाल रॅली व वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरणपूरक मशाल रॅलीस पाथर्डी फाटा येथून प्रारंभ झाला. त्याचा शुभारंभ नाशिक ममपा अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांच्या हस्ते झाला. नाशिक मनपा व नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनच्या वतीने राजीव गांधी भवन येथून सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या सायकल रॅलीचा शुभारंभ उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे यांचे हस्ते झाला. यावेळी उद्यान अधीक्षक विवेक भदाणे, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी पर्यावरण पूरक फलक दाखवून केला.

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# बाजार सजला : विविधरंगी फ्रेंडशिप बँडला पसंती













धुळे । रक्ताचे नाते नसताना जीवाला जीव लावणारा हक्काचा माणूस म्हणजे मित्र. आपल्या सुखाची आनंद मानणारा तर दुःखात धीर देणारा तोच खरा मित्र. म्हणूनच संकटकाळी जो धावतो, तोच आपला खरा मित्र, अशी म्हण प्रचलित आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी एकाच बेंचवर बसल्यानंतर सुरू झालेली मैत्री तहहयात कायम असल्याची उदाहरणे आजही पहावयास मिळतात. या वर्षी शालेय विद्यार्थी व तरुणाईमध्ये फ्रेंडशिप डे साजरा करण्याचा विशेष उत्साह दिसून येत आहे. फ्रेंडशिप बँड बांधून मैत्री अबाधित ठेवण्याबरोबरच ती अतूट राहील, असा विश्वासही यानिमित्त व्यक्त केला जातो. यानिमित्त फ्रेंडशिप बँडचे विविध प्रकार बाजारात उपलब्ध असून खरेदीसाठी तरुणाईची गर्दी होत आहे. ऑनलाईन कंपन्यांनीही मैत्री दिनानिमित्त विविध भेटवस्तू विक्रीसाठी उपलब्ध केल्या आहेत. अवघ्या १० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंत विविध प्रकारचे बँड सध्या उपलब्ध आहेत. रेशमी, कापडी, रबर, प्लास्टिकचे बँड, शुभेच्छा लिहिलेले रबरी बँड, बांगडीच्या आकारातील बँड, चौकोनी व गोल मण्यांमधील बँड, ब्रेसलेटचे आकार असलेले असे चाळीसहून अधिक प्रकार बाजारात उपलब्ध आहेत. मैत्री व्यक्त करण्यासाठी केवळ बँड बांधून ती व्यक्त करणे इतकाच पर्याय नाही. शुभेच्छा संदेश देत, सोशल मीडियावर छायाचित्रे अपलोड करीत आपल्या मैत्रीची ग्वाही वेगवेगळ्या संदेशाच्या माध्यमातून देण्यास सुरुवात झाली आहे. अनेक मित्रमंडळींनी सहलीचे नियोजन केले आहे. पर्यावरणाची जपणूक करण्यासाठी झाडांना देखील मित्र मानून त्यांनाही सामाजिक भावनेतून फ्रेंडशिप बँड बांधण्याची नवी चांगली पद्धत रूढ होताना दिसते.

संकलन : दिपक वाघ